

आपल्या भाजीपाला प्लॉट मध्ये तारादेवी

महिलांची सेंद्रिय भाजीपाला शेती

हिरदेश कुमार चुनेरा

शेती किफायतशीर नसल्यामुळे अडभोरा गावातील लोक शहरांकडे स्थलांतरित होत होते. महिलांनी सामाजिक संस्थेच्या मदतीने गटांची स्थापना करून शाश्वत शेती पद्धतीने शेती उत्पादन बऱ्यापैकी वाढविले आहे.

डोंगराळ भागातील शेती चढउतार, विखुरलेले जमिनीचे तुकडे, उथळ व धूप होणाऱ्या जमिनीमुळे खालावत जाणारा पोत यामुळे आव्हानात्मकच असते. अशा भागातील कुटुंबातील पुरुष मंडळी कामधंद्यासाठी स्थलांतर करीत असल्यामुळे महिलांवर शेतीची सर्व कामे पडतात.

ग्रामीण भागात विकासाचे काम करणाऱ्या 'संजीवनी' या संस्थेने उत्तराखंड राज्यातील भिख्यासेन या तालुक्यातील अडभोरा खेडे शाश्वत व सेंद्रीय शेती पद्धतीला चालना देण्यासाठी निवडले. संजीवनीने ५१ अल्पभूधारक शेतकरी महिलांना दोन गटात विभागून प्रकल्पाला सुरुवात केली.

महिलांना सेंद्रीय पद्धतीने शेती कशी करतात याचे प्रशिक्षण देण्यात आले. शेतातील पीक अवशेष व शेण वापरून गांडूळ खत, बायोडायनामिक कंपोस्ट आणि तरल खत (जीवामृत) तयार करण्याचे प्रशिक्षण दिले. याव्यतिरिक्त जैविक कीड व रोग नियंत्रणाच्या पद्धतीबाबत प्रशिक्षित केले. या महिलांच्या गटांनी वांगी, फुलकोबी, पत्ताकोबी, टमाटर आणि मिरची यासारख्या भाजीपाल्याचे उत्पादन घेतले. बुरशी व जिवाणूयुक्त रोगांपासून बचाव करण्यासाठी बियाणांना पी.एस.बी (PSB), ट्रायकोडर्माची बीजप्रक्रिया करण्यात आली. नर्सरी तयार करताना जमिनीच्या मशागतीकडे विशेष लक्ष देण्यात आले. मुख्य शेतात पुर्नलागवड करण्याअगोदर पंचगव्यात रोपांची मुळे डुबविण्यात

आली. त्यामुळे मागील वर्षापेक्षा चांगले उत्पादन मिळाले. त्याचे हंगामातील सरासरी उत्पन्न रु. ४७,००० वरून ८६,००० हजार पर्यंत वाढले. सोबत दुग्ध व्यवसाय केल्यामुळे मिळकतीत सातत्य राखता आली.

तक्ता क्र. १ : भाजीपाल्याचे उत्पादन

भाजीपाला	२०१३-१४ क्विं/हेक्टर	२०१४-१५ क्विं/हेक्टर
वांगी	१.०	१.५
फुलकोबी	१.५ - २.०	१.५ - २.०
पत्ताकोबी	१.५ - २.०	२.० - २.५
टमाटर	१.० - १.५	०.५ - ०.७५
मिरची	४० - ४५	४५ - ५०

सध्या, या खेड्यातून दररोज ५० लिटर दुधाचे उत्पादन होत आहे. प्रत्येक वर्षी ८ ते १० लाखाची मिरची विकली जात आहे. संजीवनी सोबत उत्तराखंड सेंद्रीय उत्पादक बोर्डामार्फत बाजारापर्यंतची साखळी उपलब्ध करून देण्यात आली आहे. जेणेकरून उपभोक्त्याच्या मध्ये दलाल येत नाही याची सोय केली आहे.

Hirdesh Kumar Chunera
Project Manager
Sanjivani Vikas avam Jankalyan Samiti
email : hirdesh.chunera@gmail.com

Source : *Organic vegetable farming by women LEISA India December, 2015*

मराठी अनुवाद : डॉ. विनोद खडसे

तारा देवीची कथा

अडभोरा गावातील ५१ वर्षाची तारादेवी नावाची महिला खूप धीट व व्यावसाईक अंश असलेली महिला. संजीवनी संस्थेने बनवलेल्या २० शेतकरी महिलांच्या गटामध्ये ती जोडली गेली. हा सेंद्रिय शेती करणाऱ्या महिलांचा गट आहे. त्याचे नाव जैविक उत्पादक उपसमुह गट असे आहे. घरातील कामाचा भार बाजूला ठेवून व लोकांच्या निंदेकडे दुर्लक्ष करुन तारादेवीने सेंद्रिय शेतीचे प्रशिक्षण घेतले. तिच्याकडे ३.५ हेक्टर जमिन आहे. त्यामध्ये मिरची हे पीक घेतले. शिवाय २० X५ मिटरचे पॉली हाऊस करुन वाटाना, कोबी, भेंडी, ढोबळी मिर्ची व वांगी अशा भाजांचे उत्पादन घेतले. त्या शिराय तीने पीच, फ्लम,ॲप्रीकॉट आणि पेरूची २०० झाडे लावली. शिवाय ६ X५X ०.५ मीटरचे शेततळे खोदून त्यामध्ये मत्स्यपालन केले. मासे विकून आलेल्या पैशातून कुक्कुटपालनासाठी शेड उभारले. आता ती दरमहा ६ ते ७ हजार रूपये डेअरी मधून कमावते व प्रत्येक सिझनला मिरचीतून २० ते २५ हजार रूपये मिळकत करते. पूर्वीपेक्षा दरमहा १० ते १५ हजार रूपयांची जास्तीची मिळकत पाहता याचा प्रभाव गावातील अनेक महिलांवर झाला. तिच्या गटातील १४ महिला सुद्धा चांगल्याच प्रभावित झाल्या आहेत.

LEISA INDIA Language Editions



Kannada, Telugu, Tamil, Oriya, Hindi, Marathi and Punjabi